निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २१९ वा.
रविवार -१२ ऑक्टोबर २०२५

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

## 'कृत्रिम बुद्धिमत्ता' आणि 'कृषी क्षेत्र' नव्या परिवर्तनाच्या दिशेने - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** आजचा काळ हा कृत्रिम बुद्धिमत्तेचा आहे. या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून समाजात साक्षरता आणि समता निर्माण होऊ शकते. तंत्रज्ञान, डिजिटायझेशन आणि कृत्रिम बुद्धिमत्ता या साधनांना भौगोलिक सीमा नाहीत त्यामुळे श्रीमंत-गरीब, जाती, भाषा असा फरक करत नाही. म्हणूनच हे तंत्रज्ञान प्रत्येक भारतीयांच्या कल्पनांना आकार देऊ शकते, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

एचपी आणि इंटेल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'एचपी ड्रीम अनलॉक्ड' या उत्सवाचे मेहबुब स्टुडिओ, वांद्रे येथे उद्घाटन करण्यात आले, त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते.कार्यक्रमाला एचपी इंडिया च्या व्यवस्थापकीय संचालिका इप्सिता दासगुप्ता, मुख्यमंत्र्यांचे सल्लागार कौस्तुभ धवसे, विपणन प्रमुख आकाश भाटिया, कायदेशीर व शासकीय व्यवहार विभाग प्रमुख राजू नायर तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, शासनाने आता एआय स्वीकारण्याचे धोरण सुरू केले आहे. हे तंत्रज्ञान सर्वांसाठी खुले असून यात प्रत्येक जण आपल्या कल्पनांना वास्तवात आणू शकणार आहे. शासनाने एचपी सोबत डिजिटल मीडिया सेंटर ऑफ एक्सलन्स उभारले असून आता आणखी पुढे जाऊन सर्वसामान्यांना नव्या तंत्रज्ञानांचा, विशेषतः -ख चा, सहज प्रवेश मिळावा यासाठी भागीदारीचा आराखडा तयार करण्याचे ठरवले आहे. कृषी क्षेत्रातही -ख चा वापर सुरू केला आहे. पुण्यात झालेल्या ॲग्री-हॅकथॉनमध्ये तरुणांनी तयार केलेले -ख मॉडेल हे हवेतील घटकांचे विश्-



लेषण करून पिकावर होणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव आणि सर्तक करते. हे खरोखरच गेम-चेंजर मॉडेल असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले की, अशा तांत्रिक हस्तक्षेपांमुळे शेतकऱ्यांचे नुकसान टळेल, खर्च कमी होईल आणि कृषीक्षेत्रात अधिक नफा मिळेल. AI, ब्लॉकचेन आणि डिजिटायझेशन या तंत्रज्ञानांनी केवळ उद्योगच नव्हे तर शासन प्रणालीतही पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढवली असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमात देशभरातील जवळपास ४० हजार तरुणांनी सहभाग घेतला असून त्यापैकी ४० सर्वोत्तम नवीन कल्पक उपक्रमांचा सन्मान करण्यात आला. हे ४० नवीन उपक्रम समाजात आणि अर्थव्यवस्थेत प्रत्यक्ष परिणाम करू शकतील या उपक्रमांच्या माध्यमातून नागरीकांचे जीवनमान उंचवण्यासाठी शासन भागीदारी करण्यास तयार असल्याचे मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी सांगितले.

## भारतात एक कुटुंब घरी किती सोनं ठेवू शकतं? कायदा काय सांगतो?

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/**भारतात सोनं केवळ धातू नाही, तर सांस्कृतिक वारसा, उत्सवांचा अविभाज्य भाग आणि आर्थिक सुरक्षेचे प्रतीक आहे. अनेक कुटुंबांमध्ये पिढ्यान्पिढ्या सोने साठवले जाते. मात्र एका व्यक्ती किंवा कुटुंबाला किती सोने ठेवण्याची परवानगी असते? हा प्रश्न नेहमीच उपस्थित होतो. याबाबत सविस्तर जाणून घेऊया.

केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाने (सीबीडीटी) १९९४ च्या परिपत्रकात छाप्यांदरम्यान जप्ती टाळण्यासाठी 'सुरक्षित मर्यादा' निश्चित केली. विवाहित महिलांसाठी ५०० ग्रॅम, अविवाहित महिलांसाठी २५० ग्रॅम आणि पुरुषांसाठी १०० ग्रॅम सोने (दागिने किंवा दागिन्यांपुरते) कागदांशिवायही जप्त होणार नाही. बिस्किट किंवा बारवर ही मर्यादा लागू नाही. ही सीमा व्यक्तीगत आहे, म्हणून कुटुंबातील सदस्यांच्या संख्येनुसार एकूण मर्यादा वाढते.

समजा, पती-पत्नी, एक अविवाहित मुलगा आणि एक अविवाहित मुलगी असलेल्या कुटुंबात एकूण ९५० ग्रॅम सोने (दागिने) कागदांशिवायही कायदेशीर मानले जाते. छापेमध्ये हे जप्त होणार नाही, जरी पुरावा नसला तरी. यामुळे सामान्य कुटुंबांना आधार मिळतो.

जास्त सोने आढळले तरी चिंता नको, फक्त वैध स्रोत सिद्ध करा. खरेदी बिल, उत्पन्नाचे प्रमाणपत्र (वेतन, शेती किंवा करमुक्त), वारसा दस्तऐवज (मृत्युपत्र किंवा फेरफार) किंवा भेट पुरावा (लग्नाचे आमंत्रण किंवा सत्यापन) ठेवा. यामुळे आयकर अधिकाऱ्यांचे समाधान होईल.

सोन्याच्या मोठ्या साठ्याची नोंद नेहमी ठेवा. खरेदीवेळी जीएसटी बिल घ्या, वारसा किंवा भेटीचे रेकॉर्ड राखा. सीबीडीटीची सुरक्षित सीमा लक्षात ठेवा आणि कुटुंबप्रत्येक सदस्याच्या नावाने सोने वाटा. हे उपाय मनमानी जप्ती रोखतील आणि कायद्याचे संरक्षण करतील.थोडक्यात सांगायचं तर भारतीय कायदा सोन्याच्या जमा मर्यादेवर बंधने घालत नाही. फक्त वैधता सिद्ध करा. ही सुरक्षित सीमा छाप्यांविरुद्ध संरक्षक कवच आहे.

गोल्ड कंट्रोल कायदा रद्द झाल्यानंतर सोन्याच्या जमा मर्यादेवर कोणतेही निर्बंध नाहीत. तुम्ही कितीही सोने ठेवू शकता. ते कायदेशीर मार्गाने मिळवलेले असावे. खरेदी बिल, वारसा दस्तऐवज किंवा भेटवस्तूचे पुरावे असतील, तर मर्यादाहून अधिक सोनेही सुरक्षित राहते. हे पुरावे आयकर विभागाच्या तपासात महत्त्वाचे ठरतात.गोल्ड कंट्रोल ॲक्ट १९६८ चे १९९० मध्ये निरसन झाल्याने, आता कोणत्याही भारतीय नागरिकाला सोन्याची, दागिन्यांची किंवा नाण्यांची अनिर्बंध मालकी ठेवता येते.असे असले तरी ते वैध उत्पन्नातून खरेदी केल्याचा पुरावा असावा.

# सरकारकडुन २५१ तालुके पूर्णतः तर ३१ तालुके अंशतः आपत्तीग्रस्त म्हणून घोषित

## आपत्तीग्रस्त तालुक्यांसाठी विशेष मदत पॅकेज, सवलती लागू

### शेती, घरे, जनावरे, मत्स्यव्यवसाय, पायाभूत सुविधा दुरुस्तीस मोठा दिलासा - मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई /प्रतिनिधी/** राज्यात जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत अतिवृष्टी, पूर आणि विविध नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या मोठ्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने २५१ तालुके पूर्णतः तर ३१ तालुके अंशतः आपत्तीग्रस्त/अतिवृष्टीग्रस्त म्हणून घोषित करून आपत्तीमुळे बाधितांना विशेष मदत पॅकेज आणि विविध सवलती लागू केल्या आहेत. तसेच आपद्ग्रस्त तालुक्यातील बाधितांना दुष्काळ सदृश परिस्थितीत लागू असणाऱ्या सवलती देण्यास मान्यता देण्यात आली आहे. या संदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे, अशी माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिली.

अतिवृष्टी व पुरामुळे शेतीपिकांचे नुकसान, शेतजमीन वाहून जाणे, घरांची पडझड, जनावरांची हानी आणि मालमत्तेचे नुकसान झाले आहे. या सर्व आपद्ग्रस्तांना तातडीने दिलासा मिळावा म्हणून राज्य शासनाने हे विशेष पॅकेज लागू केले आहे. या विशेष पॅकेजमुळे बाधित पिके, शेती, घरे, जनावरे, मत्स्यव्यवसाय, पायाभूत सुविधा दुरुस्तीस मोठा दिलासा मिळणार असल्याचा विश्वास मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी व्यक्त केला.

जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत अतिवृष्टी व पुरामुळे बाधित २५१ पूर्णतः व ३१ अंशतः बाधित तालुक्यातील बाधित पिकांचे तातडीने पंचनामे करण्यात आले. जून ते ऑगस्ट २०२५ या कालावधीत २६.६९ लाख हेक्टर तर सप्टेंबर २०२५ मध्ये जवळ जवळ ३९ लाख हेक्टर अशा सुमारे ६५ लाख हेक्टर क्षेत्रावरील शेत पिकांचे नुकसान झाले असल्याचेही मदत व पुनर्वसन मंत्री श्री. जाधव-पाटील यांनी सांगितले.आर्थिक साहाय्य - आपद्ग्रस्त मृत व्यक्तींच्या कुटुंबीयांना रुपये चार लाख, अवयव अथवा डोळे निकामी झाल्यास ४० ते ६० टक्के अपंगत्व आल्यास रुपये ७४ हजार, ६० टक्के पेक्षा अधिक अपंगत्व आल्यास २ लाख ५० हजार, जखमी व्यक्ती रूग्णालयात एक आठवड्यापेक्षा अधिक कालावधीसाठी दाखल झाला असल्यास १६ हजार, एक आठवड्यापेक्षा कमी कालावधीसाठी दाखल असल्यास ५ हजार ४०० रुपये.

**घरांसाठी मदत - पूर्णतः** नष्ट झालेल्या पक्क्या /कच्च्या घरांसाठी- सपाट भागातील प्रती घर रुपये १ लाख २० हजार तर डोंगराळ भागातील घरांसाठी १ लाख ३० हजार, अंशतः पडझड झालेल्या घरांसाठी (किमान १५ टक्के) पक्क्या घरांसाठी प्रती घर ६ हजार ५०० रुपये, कच्च्या घरांसाठी प्रती घर चार हजार रुपये, प्रती झोपडी आठ हजार रुपये, प्रती गोठा तीन हजार रुपये.

**मृत जनावरांसाठी** - दुधाळ जनावरांसाठी प्रती जनावर ३७ हजार ५०० रुपये, ओढकाम करणाऱ्या जनावरासाठी प्रती जनावर ३२ हजार रूपये, लहान जनावरासाठी प्रती जनावर २० हजार रूपये, शेळी मेंढी प्रती जनावर चार हजार रुपये आणि प्रती कोंबडी १०० रुपये.शेतीपिकांचे नुकसान - प्रति हेक्टर ८ हजार ५०० रुपये (तीन हेक्टर मर्यादेत), आश्वासित सिंचनाखालील (बागायत) पिकासाठी प्रती हेक्टर १७ हजार (तीन हेक्टर मर्यादेत), आणि बहुवार्षिक पिकांसाठी प्रती हेक्टर २२ हजार ५०० रुपये (तीन हेक्टर मर्यादेत).

**शेतजमीन नुकसान** - नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतजमिनीवरील गाळ काढणे प्रती हेक्टर १८ हजार रुपये आणि दरड कोसळणे/ जमीन जमीन खरडणे, खचणे व नदीपात्र प्रवाह बदलल्यामुळे शेतजमीन वाहून जाणे यासाठी केवळ अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना प्रती हेक्टर ४७ हजार रुपये मदत देण्यात येणार आहे.

**मत्स्य व्यवसाय** - मत्स्य व्यावसायिकांना बोटींची दुरुस्ती, जाळी यासाठी बोटींची अंशतः दुरुस्ती सहा हजार रुपये, पूर्णतः नष्ट झालेल्या बोटींसाठी १५ हजार, अंशतः बाधित झालेल्या जाळ्यांच्या दुरुस्तीसाठी तीन हजार रुपये आणि पूर्णतः नष्ट झालेल्या जाळ्यांसाठी चार हजार रुपये मदत देण्यात येणार आहे.

**इतर सवलती-** नैसर्गिक आपत्तीमध्ये बाधित शेतकऱ्यांसाठी आणि नागरिकांसाठी सवलती लागू केल्या असून यामध्ये जमीन महसूलात सूट, सहकारी कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस एक वर्षासाठी स्थगिती, तिमाही वीज बिलात माफी, परीक्षा शुल्कात माफी व १० वी आणि १२ वी च्या विद्यार्थ्यांची फी माफी या सवलतींचा समावेश करण्यात आला आहे.या सवलतीबाबत योजनेचे स्वरूप व त्या बाबतच्या सविस्तर मार्गदर्शक सूचना/ आदेश संबधित प्रशासकीय विभागामार्फत निर्गमित करण्यात येणार आहेत.

**कृषी विभाग** - या रब्बी हंगामामध्ये शेतकऱ्यांना खते व बियाणे घेण्यासाठी प्रति हेक्टरी १० हजार प्रमाणे (तीन हेक्टरच्या मर्यादेत) मदत कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये थेटपणे जाईल याबाबत आवश्यक ती कार्यप्रणाली व निधी उपलब्धतेबाबत कार्यवाही कृषी विभागाने करावयाची आहे.

**पशुसंवर्धन विभाग** - मोठे पशुधन, लहान पशुधन व कुक्कुटपक्षी मृत पावलेले आहेत. याबाबत शासन निर्णय २७ मार्च २०२३ च्या निकष व दरानुसार मदत व पुनर्वसन विभागाकडून मदत दिली जाईल. याबाबतची कार्यवाही जिल्हास्तरावरुन प्रचलित निकषानुसार उपलब्ध असलेल्या उणे प्राधिकरण सुविधेनुसार तातडीने करावी. २७ मार्च २०२३ च्या शासन निर्णयाच्या निकषाबाहेरील (वाढीव पशुधन हानी) पशुधन हानीसाठीचे निकष शिथिल करण्यात येऊन जेवढे पशुधनाचे नुकसान झाले आहे त्या सर्व पशुधन हानीबाबत पशुसंवर्धन विभागामार्फत कार्यवाही करण्यात येणार आहे.

मत्स्यव्यवसाय - मच्छीमार जाळी, मत्स्यबीज, मत्स्य बोटींचे नुकसान झालेले आहे याबाबत शासन निर्णय २७ मार्च २०२३ च्या निकष व दरानुसार मदत व पुनर्वसन विभागाकडून मदत देण्यात येणार आहे. २७ मार्च २०२३ च्या शासन निर्णयातील निकषाबाहेरील (वाढीव मत्स्यबीज हानी, मच्छिमार जाळी) हानीसाठीचे निकष शिथिल करण्यात येऊन जेवढे मत्स्यबीज हानी व मच्छिमार जाळीचे नुकसानीबाबत मत्स्यव्यवसाय विभागामार्फत कार्यवाही करण्यात येईल.

**रोजगार हमी योजना विभाग-** अतिवृष्टी व पुरामुळे शेतकऱ्यांची शेतजमीन खरडून जाऊन झालेल्या नुकसानीसाठी शासन निर्णय दि.२७ मार्च २०२३ च्या निकष व दरानुसार मदत व पुनर्वसन विभागाकडून मदत दिली जाईल. या मदतीव्यतीरिक्त रोजगार हमी योजना विभागामार्फत शेतकऱ्यांच्या शेतजमिनी लागवडीयोग्य करण्यासाठी जास्तीत जास्त तीन लाख प्रति हेक्टर या मर्यादित व दोन हेक्टर पर्यंत पाच लाख मदत अनुज्ञेय राहणार आहे. तसेच अतिवृष्टी व पुरामुळे खचलेल्या व बुजलेल्या सिंचन विहिरी दुरुस्तीच्या कामासाठी प्रत्यक्ष खर्चास किंवा प्रती विहिर कमाल मर्यादा ३० हजार रुपये यापैकी जी रक्कम कमी असेल ती लाभार्थ्यास अनुज्ञेय राहणार आहे. यासाठी रोजगार हमी योजना विभागामार्फत आवश्यक निधीबाबत कार्यवाही करण्यात येईल.

**पायाभुत सुविधा-** अतिवृष्टी व पुरामुळे बाधित झालेल्या ग्रामविकास, सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा, ऊर्जा या विभागांतर्गतच्या तातडीच्या व आवश्यक कामांसाठी रुपये १० हजार कोटीचे विशेष पॅकेज संदर्भात संबंधित विभागाने नियोजन

## आपत्तीग्रस्त तालुक्यातील बाधितांना दुष्काळ सदृश परिस्थितीत लागू असणाऱ्या सवलती; शासन निर्णय निर्गमित



व वित्त विभागाच्या मान्यतेने स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येणार आहे.अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे प्रभावित / घोषित तालुक्यामध्ये जाहीर करण्यात आलेल्या उपाययोजना खरीप हंगाम २०२५ (जून ते ऑक्टोबर) साठी लागू राहतील. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन माहिती प्रणालीद्वारे (एनडीएमआयएस) शासनाने जाहीर केलेल्या मदतीच्या विशेष पॅकेज मधील योजना, उपक्रम / कामांची माहिती केंद्र शासनाच्या एनडीएमआयएस पोर्टलवर भरण्यात येणार आहे.

ई-केवायसी- ज्या शेतकऱ्यांची ॲग्रीस्टॅक मध्ये नोंदणी होऊन ॲग्रीस्टकमध्ये ई-केवायसी झाली आहे अशा शेतकऱ्यांची माहिती डीबीटी प्रणालीवर भरलेल्या माहितीशी जुळत असलेल्यांना मदत मिळणे सुलभ व सुकर होण्यासाठी (डीबीटी द्वारे मदत वितरणासाठीच्या आवश्यक) ई-केवायसी प्रक्रियेपासून सूट देण्यात येत आहे.

**अतिवृष्टी व पुरामुळे पूर्णतः बाधित तालुके-**

**पालघर :-** पालघर, डहाणू, तलासरी, विक्रमगड (चार तालुके)

**नाशिक-** मालेगाव, निफाड, नांदगाव, सटाणा, दिंडोरी, सुरगाणा, नाशिक, त्र्यंबकेश्वर, पेठ, सिन्नर, चांदवड, येवला ( १२ तालुके)

**जळगांव-** एरंडोल, पारोळा, धरणगाव, पाचोरा, जामनेर, जळगाव, भडगाव, अमळनेर, रावेर, चाळीसगाव, भुसावळ, बोदवड, मुक्ताईनगर (१३ तालुके)

**अहिल्यानगर-** अहिल्यानगर, शेवगाव, कर्जत, पाथर्डी, नेवासा, राहाता, श्रीरामपूर, जामखेड, राहुरी, श्रीगोंदा, कोपरगाव ( ११ तालुके)

**सोलापूर-** उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, बार्शी, अक्कलकोट, पंढरपूर, मोहोळ, मंगळवेढा, माळशिरस, माढा, करमाळा, सांगोला ( ११ तालुके)

**सांगली-** मिरज, वाळवा, शिराळा, पलूस, तासगाव, कवठेमहांकाळ, विटा, आटपाडी, जत ( नऊ तालुके)

**सातारा-** कोरेगाव, खटाव, माण ( तीन तालुके)

**कोल्हापूर-** करवीर, राधानगरी, गगनबावडा, आजरा, चंदगड ( पाच तालुके)

**छत्रपती संभाजीनगर-** छत्रपती संभाजीनगर, कन्नड, सोयगाव, पैठण, वैजापूर, गंगापूर, खुलताबाद, सिल्लोड, फुलंब्री (नऊ तालुके)

**जालना-** बदनापूर, घनसावंगी, अंबड, जालना, परतूर, मंठा, भोकरदन, जाफ्राबाद ( आठ तालुके)

**बीड-** बीड, गेवराई, माजलगाव, केज, आंबेजोगाई, परळी, आष्टी, पाटोदा, शिरूर कासार, धारूर, वडवणी ( ११ तालुके)

**लातूर -** लातूर, औसा, रेणापूर, निलंगा, शिरुरअनंतपाळ, देवणी, उदगीर, जळकोट, अहमदपूर, चाकूर ( १० तालुके)

**धाराशिव-** धाराशिव, कळंब, भूम, वाशी, तुळजापूर, लोहारा, परांडा, उमरगा ( आठ तालुके)

**नांदेड-** कंधार, किनवट, मुदखेड, भोकर, अर्धापूर, माहूर, नांदेड, लोहा, मुखेड, देगलूर, बिलोली, धर्माबाद, नायगाव, हदगाव, हिमायतनगर, उमरी ( १६ तालुके)

**परभणी-** पूर्णा, पालम, परभणी, सोनपेठ, जिंतूर, गंगाखेड, सेलू, मानवत, पाथरी ( नऊ तालुके)

**हिंगोली-** हिंगोली, औंढा नागनाथ, कळमनुरी, सेनगाव, वसमत ( पाच तालुके)

**बुलढाणा-** चिखली, सिंदखेडराजा, देऊळगावराजा, लोणार, शेगाव, मोताळा, बुलढाणा, खामगाव, मेहकर, मलकापूर, जळगाव जामोद ( ११ तालुके)

**अमरावती-** अमरावती, भातुकली, चांदूर रेल्वे, नांदगाव खंडेश्वर, धामणगाव रेल्वे, अचलपूर, अंजनगाव सुर्जी, तिवसा, धारणी, चिखलदरा, वरुड, मोर्शी, चांदुरबाजार, दर्यापूर ( १४ तालुके)

**अकोला-** अकोट, अकोला, पातूर, तेल्हारा, मुर्तीजापूर, बाळापूर, बार्शी टाकळी ( सात तालुके)

**वाशिम-** वाशीम, रिसोड, मालेगाव, मंगळूरपीर, कारंजा, मानोरा ( सहा तालुके)

**यवतमाळ-** पुसद, यवतमाळ, बाभूळगाव, मारेगाव, महागाव, उमरखेड, कळंब, घाटंजी, राळेगाव, दारव्हा, आर्णी, नेर, दिग्रस, पांढरकवडा, वणी, झरी जामणी ( १६ तालुके)

**वर्धा-** वर्धा, सेलू, देवळी, आर्वी, समुद्रपूर, हिंगणघाट, कारंजा, आष्टी ( आठ तालुके)

**नागपूर-** नागपूर, कामठी, सावनेर, पारशिवनी, मौदा, भिवापूर, कळमेश्वर, काटोल, रामटेक, हिंगणा, उमरेड, कुही, नरखेड ( १३ तालुके)

**भंडारा-** साकोली, भंडारा, मोहाडी, तुमसर, पवनी, लाखनी, लाखंदूर ( सात तालुके)

**गोंदिया-** देवरी ( एक तालुका)

**चंद्रपूर-** चंद्रपूर, भद्रावती, राजूरा, बल्लारपूर, कोरपना, मूल, वरोरा, सावली, चिमूर, नागभिड, सिंदेवाही, पोंभुर्णा, जिवती, ब्रम्हपुरी ( १४ तालुके)

**गडचिरोली-** गडचिरोली, धानोरा, मूलचेरा, आरमोरी, कुरखेडा, अहेरी, सिरोंचा, भामरागड, एटापली, देसाईगंज (वडसा) (१० तालुके)

**अतिवृष्टी व पुरामुळे अंशतः बाधित तालुके-**

**नाशिक -** कळवण, देवळा, इगतपुरी (तीन तालुके)

**धुळे -** धुळे, साक्री, शिंदखेडा (तीन तालुके)

**अहिल्यानगर -** पारनेर, संगमनेर, अकोले (तीन तालुके)

**पुणे -** हवेली, इंदापूर (दोन तालुके)

**सांगली -** कडेगांव (एक तालुका)

**सातारा -** सातारा, कराड, पाटण, फलटण, जावळी (पाच तालुके)

**कोल्हापूर -** कागल, शिरोळ, पन्हाळा (तीन तालुके)

बुलढाणा - नांदुरा, संग्रामपूर (दोन तालुके)

**गोंदिया -** तिरोडा, गोंदिया, गोरेगाव, मोरअर्जुनी, सालेकसा, सडक अर्जुनी, आमगाव (सात तालुके)

**गडचिरोली -** चारमोशी, कोरची (दोन तालुके)

अंशतः बाधित तालुक्यांमध्ये प्रत्यक्ष बाधित मंडळ सवलतीस पात्र असतील.

# बँक फीमध्ये भरमसाठ वाढ!

देशातील सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रातील बँका येत्या १ नोव्हेंबरपासून ऑनलाइन सेवांसाठी शुल्क वाढवून ग्राहकांना धक्का देण्याच्या तयारीत आहेत. या निर्णयाचा फटका कोट्यवधी ग्राहकांना बसणार आहे. गेल्या दीड दशकात बँकिंग सेवांमध्ये बरीच सुधारणा झाली असली तरी बँकांनी जवळजवळ प्रत्येक सेवेवर शुल्क लादल्याने ग्राहकांना फटका बसत आहे. आता तर या दरांमध्ये अधिक वाढ होणार असून अगदी किती वाजता व्यवहार केले जाणार यावरुनही अतिरिक्त शुल्क आकारले जाणार आहे. नेमके किती शुल्क कोणत्या सोयीसाठी आकरले जाणार आहे जाणून घेऊयात...

सरकारी व खासगी बँकांनी अनेक नवीन सेवा शुल्क जाहीर केले आहेत, जे येत्या काही दिवसांत लागू होतील. एसबीआयने क्रेडिट कार्डसाठी नवीन शुल्क अटी जाहीर केल्या आहेत. आता रिवॉर्ड पॉइंट्सने खरेदी केलेल्या उत्पादनांवर किंवा व्हाउचरवर ९९ रुपये शुल्क भरावे लागेल.

वीज, फोन, गॅस इत्यादींसाठी ५० हजार रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या पेमेंटवर १% शुल्क आकारले जाईल. कॉलेज, शाळेची फी भरण्यासाठी थर्ड पार्टी ॲप किंवा वेबसाइटद्वारे केलेल्या पेमेंटवर १% शुल्क आकारले जाईल. मात्र, हे शुल्क शाळा किंवा महाविद्यालयात थेट केलेल्या पेमेंटवर लागू होणार नाही.

डिजिटल वॉलेटमध्ये १ हजार रुपयांपेक्षा जास्त रक्कम जमा केल्यास १% शुल्क आकारलं जाणार आहे.

रात्री व्यवहार केल्यास वाढीव शुल्क एचडीएफसी बँक रात्री ११ ते सकाळी ७ वाजेपर्यंत कॅश रिसायकलर मशीन्समध्ये जमा केलेल्या रोख रकमेवर सर्व खात्यांसाठी प्रति व्यवहार ५० रुपये अतिरिक्त शुल्क आकारेल. हे दर १ नोव्हेंबरपासून लागू होतील. यामुळे कमी उत्पन्न असलेल्या ग्राहकांवर बोजा पडण्याची शक्यता जास्त आहे.

कोणत्या सेवेसाठी किती शुल्क?

डुप्लिकेट पासबुक १०० रुपये,एंट्रीसह डुप्लिकेट पासबुक ५० रुपये प्रति पेज,अतिरिक्त चेक पेमेंट थांबवणे २०० रुपये प्रति चेक,ग्राहकाच्या चुकीमुळे चेक परत येणे १५० रुपये,साईन व्हेरिफिकेशन १०० रुपये

संयुक्त बैंक खात्यात स्वाक्षरी पडताळणी १५० रुपये,डिमांड ड्राफ्ट (५ ते १० हजार) ७५ रुपये,पोस्टल शुल्क ५० ते १०० रुपये,रोख रक्कम काढणे (५ वेळा नंतर) ७५ रु. प्रत्येकवेळी,खाते देखभाल शुल्क ५०० रुपये

एसएमएस अलर्ट १० ते ३५ रुपये प्रति तिमाही,मोबाईल नंबर, ईमेल आयडी बदलणे ५० रु. जीएसटी,डेबिट कार्ड देखभाल शुल्क २५० ते ८०० रुपये,डेबिट कार्ड री-पिन बदलणे २५ ते ५० रुपये

## उद्धव पक्षाच्या वतीने पूरग्रस्तांना कीट वाटप

केज /प्रतिनिधी /केज तालुक्यातील राजेगाव,बोरगाव, दैठणा येथील पूरग्रस्तांना संपर्कप्रमुख परशुराम जाधव यांच्या हस्ते व मुंबई नगरसेवक बाळा चव्हाण यांचा सहकार्याने किराणा किट वाटप अतिवृष्टीमुळे केज तालुक्यातील अनेक गावात पिकाचे नुकसान तसेच पूर परिस्थितीमुळे घराचे नुकसान झालेले आहे यामध्ये संसाराची राख रांगोळी झालेली दिसून येत आहे म्हणून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने एक सामाजिक बांदल की म्हणून बीड जिल्हा बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव साहेब यांच्या हस्ते पूरग्रस्तांना २०० किराणा किड्स वाटप मौजे बोरगाव दैठणा राजेगाव या ठिकाणी वाटप करण्यात आले यावेळी मा. जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे, जिल्हा संघटक नितीन धांडे, तालुकाप्रमुख अशोक जाधव शहर प्रमुख तात्या रोडे सह प्रभाकर शिंदे, समीर जाधव, धर्मेश सकपाळ उपस्थित होते.

# केज शहरात तळीरामाचा भर रस्त्यात उच्छाद,केज पोलिसांचा कानाडोळा की वक्रदृष्टी

**आत्ताच एक्सप्रेस**

**केज/ प्रतिनिधी/** बीड जिल्ह्यातील केज तालुक्या सह शहरात जागोजागी तळीरामाने उच्छाद मांडला आस्ताना शहरात जागोजागी मटका, गुटखा, हातभट्टी दारू, गल्लीबोळामध्ये सर्रासपणे देशी दारू यासह अवैध प्रवासी वाहतूक सर्रास चालू असताना केज पोलिस स्टेशन या कडे कानाडोळा करत अवैध धंदे करण्यासाठी मुक संमती देत आहे की काय? आसे नागरिकांमधून बोलताना दिसते,भर रस्त्यावर तर तळीरामाने उच्छाद मांडला आस्ताना नागरिकांना व वाहन चालकांना रस्त्यावर त्रास सहन करावा लागत आहे, परंतु याकडे केज पोलिस मुग गिळुन गप्प का? आसा संतप्त सवाल नागरिकांमधून उपस्थित होत आहे.



केज शहरांमध्ये व तालुक्यात गल्लीबोळामध्ये सर्रासपणे हातभट्टी दारू व देशी दारूची राजरोजपणे विक्री केली जात आहे. त्याचबरोबर शासकीय कार्यालयाच्या परिसरात राजरोजपणे मटका खेळला जातो व घेतला जात आहे. शहरातील अनेक ठिकाणी बारा ते अठरा वर्षाखालील तरुण हे विविध प्रकारची नशा करत आहेत. सध्या शहरांमध्ये कॅरीबॅग मध्ये सोल्युशन टाकून नशा करण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात निदर्शनास येत असून यासह अनेक प्रकारच्या नशा तरुण युवक करत असल्यामुळे अनेक तरुणांना स्वतःचा जीव गमवावा लागला आहे अनेकांचे संसार उघड्यावर आलेले आहेत अशा जनसामान्यातून प्रतिक्रिया ऐकण्यास मिळत आहेत. अवैध व्यवसाय करणाऱ्यांना नेमका अभय कोणाचा आहे असा जनसामान्यातून सवाल उपस्थित केला जात आहे. प्रशासन अवैध व्यवसायाकडे लक्ष देईल का? व्यसनापासून तरुणाची सुटका केली जाईल का? असा प्रश्न जनसामान्यातून उपस्थित केला जात आहे.

# वेळूवन बुद्ध विहार भिमनगर केज येथे वर्षावास व ग्रंथवाचन समारोप संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**केज/ प्रतिनिधी/** केज शहरातील वेळूवन बुद्ध विहार भीम नगर येथे वर्षावास व ग्रंथवाचन समारोप संपन्न झाला.बौद्ध धम्मामध्ये वर्षावास हा एक पवित्र, अनुशासनात्मक आणि धम्मशिक्षणासाठी अत्यंत महत्त्वाचा काळ मानला जातो. आषाढ पौर्णिमेपासून सुरू होणारा हा काळ अश्विन पौर्णिमे पर्यंत चालतो. याकाळात वेळूवन विहारामध्ये दरवर्षी प्रमाणे बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर लिखितबुद्ध आणि त्यांचा धम्म या महान ग्रंथाचे नियमीत वाचन व चिंतन केले गेले तसेच धम्म प्रवचन मालिकेअंतर्गत विविध विषयांवर प्रवचन झाले व धम्म विचार रुजविण्यात आला. सर्वप्रथम आदर्शांना वंदन करून उपस्थितांनी पंचशील ग्रहण केले.भारतीय बौद्ध महासभेचे शहराध्यक्ष आयु. जयपाल मस्के यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी धम्म प्रवचन मालिकेतील बौद्ध धम्म आणि मानवता या विषयावर भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा पूर्वचे पर्यटन प्रसार चे उपाध्यक्ष आयु.संभाजी सोनवणे यांनी विचार मांडले. यावेळी विहारात भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा पूर्वचे पदाधिकारी कोषाध्यक्ष आयु.सुनील शिंदे, आयु.अरुण पटेकर, आयु.मधुकर कदम, तालुकाध्यक्ष आयु.बालासाहेब जोगदंड, सरचिटणीस आयु.रंजीत घाडगे व कोषाध्यक्ष आयु.बळीराम सोनवणे यांची उपस्थिती होती.

भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी अक्षय हजारे यांची भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या शहराध्यक्ष पदासाठी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. विहारात येणाऱ्या सर्व बालक बालिका यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या बावीस प्रतिज्ञा, संविधान प्रास्ताविका मुखोद्गत आहेत त्या सर्वांचे कौतुक करण्यात आले यामध्ये विहारात नियमितपणे येणारी साडेचार वर्षाची कु.आर्या हजारे हिने सर्वांना संविधान प्रास्ताविक म्हणून दाखविले तिचा प्रातिनिधिक स्वरूपात सत्कार करण्यात आला.जिल्हा कोषाध्यक्ष आयु.सुनील शिंदे,आयु.अरुण पटेकर,आयु.मधुकर कदम यांनी वेळूवन विहारात चालणाऱ्या कामाबद्दल शुभेच्छा दिल्या.कदम बोलताना म्हणाले , वेळूवन बुद्ध विहार हे तालुक्याचे ऊर्जा केंद्र आहे.आयु.संभाजी सोनवणे यांनी आपला विषय मांडताना बौद्ध धम्म हा मानवता शिकवणारा महान धम्म आहे असे प्रतिपादन केले.



अध्यक्षीय भाषणात आयु.जयपाल मस्के यांनी बुद्ध आणि त्यांचा धम्म या महत्त्वपूर्ण ग्रंथाचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की, या ग्रंथामध्ये धम्माच्या शुद्ध शिकवणीसह मानवी मूल्यांचे विवेचन आहे. वर्षावासाच्या काळात याचे वाचन हे बौद्ध अनुयायांसाठी दिशा दाखवणारे ठरते. वर्षावास काळात ग्रंथ श्रवण करण्यासाठी उपस्थित सर्व बौद्ध उपासक-उपासिका,बालक-बालिका यांचे यावेळी आभार मानले. त्याचबरोबर समारोप प्रसंगी उपस्थित भारतीय बौध्द महासभेचे सर्व जिल्हा पदाधिकारी,तालुका पदाधिकारी व शहर पदाधिकारी यांचे आभार मानले. धम्मयान मासिक,सक्रिय सभासद पावती ,महाविहार महाबोधि आंदोलन, तसेच बौद्ध,मातंग,चर्मकार, ओबीसी बंधुभाव परिषद याबद्दल उपस्थितांना माहिती करून दिली. सर्वांनी भारतीय बौद्ध महासभेत सक्रियपणे काम करावे असे आवाहन करण्यात आले.

संपूर्ण कार्यक्रमाचे बहारदार संचलन भारतीय बौद्ध महासभेचे शहर सरचिटणीस आयु.शिवकुमार मस्के यांनी केले.प्रास्ताविक आयु.बालासाहेब जोगदंड यांनी केले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी भारतीय बौद्ध महासभेचे माजी शहराध्यक्ष डॉ. प्रभाकर ठोके व आयु.महेंद्र मस्के यांचे योगदान लाभले. यावेळी विहारात भारतीय बौद्ध महासभेचे शहर पदाधिकारी आयु.चंद्रकांत मस्के, कल्याण मस्के, राहुल माने, अजय गालफाडे, शिवमूर्ती हजारे, अक्षय हजारे, सुशील मस्के, दीपक मस्के, प्रमोद मस्के तसेच महिला शाखेच्या तालुकाध्यक्ष आयु.महानंदा गायकवाड,संस्कार सचिव आयु .कौशल्या मस्के महिला शहराध्यक्ष आयु.सुनीता कांबळे, सरचिटणीस आयु.सुरेखा मस्के, विजयमाला हजारे, कलावती हजारे, सुनीता हजारे, जनाबाई मस्के, रत्नमाला मस्के, आशाताई मस्के, पुष्पा मस्के, कुसुम मस्के तसेच सावित्रीबाई कांबळे, अंजली गायकवाड, हौसाबाई हजारे, प्रमिला मस्के, लक्ष्मीबाई मस्के, गंगुबाई मस्के, सिमंताबाई हजारे तसेच रिपाईचे सुनील हिरवे, आश्रूबा खरात,राहुल मस्के, भारत ढालमारे, लखन मस्के यांची उपस्थिती होती. शेवटी सरनत्त घेऊन, खीरदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# बसपच्या कार्यक्रमात बहुजन ऐक्याचा निर्धार

**आत्ताच एक्सप्रेस**

**सोलापूर/प्रतिनिधी/**बहुजन समाज पार्टीचे संस्थापक आणि बहुजन नायक मान्यवर कांशीराम साहेब यांच्या परिनिर्वाण दिनानिमित्त सोलापूर येथे बहुजन समाज पक्षाच्या वतीने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमात पक्षाचे महाराष्ट्र केंद्रीय प्रभारी व माजी खासदार मा.राजाराम जी, प्रदेशाध्यक्ष ॲड. सुनील डोंगरे तसेच प्रदेश महासचिव व पश्चिम महाराष्ट्र झोन मुख्य प्रभारी डॉ.हुलगेश चलवादी प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थितांनी कांशीराम साहेबांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन सोलापूर जिल्हाध्यक्ष बबलू गायकवाड आणि शहर अध्यक्ष देवा उघाडे यांनी केले. कार्यक्रमात राज्य प्रभारी रामचंद्र जाधव, सतीश शिंदे, मुकुंद सोनवणे, प्रदेश सचिव अप्पा लोकरे, संजीव सदाफुले,




स्टेट कमिटी मेंबर, जिल्हाध्यक्ष उपस्थित होते.

मान्यवर कांशीराम साहेबांनी बहुजन समाजाला शासन करण्यास सक्षम अशी संघटित शक्ती बनवली. त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे 'राजकीय सत्तेचे स्वराज्य' हे स्वप्न प्रत्यक्षात आणले. त्यांच्या कार्यामुळे बहुजन चळवळ देशभर फोफावली, असे प्रतिपादन यावेळी उपस्थितांना संबोधित करतांना मा.राजाराम यांनी केले.बहन सुश्री मायावती जी यांनी उत्तर प्रदेशचे चार वेळा मुख्यमंत्रीपद भूषवून बहुजन समाजाला सत्तेच्या मुख्य प्रवाहात आणले. समाजातील वंचित घटकांचा विकास साधणे हेच त्यांच्या राजकारणाचे ध्येय राहिले आहे. हेच ध्येय घेऊन देशातील प्रत्येक राज्यात बसपा कार्यरत असल्याचे मा.राजाराम म्हणाले.

बहन मायावती जी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि राष्ट्रीय संयोजक आकाश आनंद यांच्या नेतृत्वात बसपा आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत यश मिळवेल. समाजाच्या सक्षमीकरणासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने एकदिलाने काम करण्याची गरज आहे,असे आवाहन ॲड.सुनील डोंगरे यांनी केले.

बहुजन चळवळीच्या पुढील दिशा आणि संघटनात्मक बळकटी यावर देखील त्यांनी मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचा समारोप बहुजन एकता जिंदाबाद या घोषणांनी झाला.मान्यवर कांशीराम साहेबांच्या विचारांनी प्रेरित या कार्यक्रमाने कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण केले.




अर्धापूर - महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या अर्धापूर तालुकाध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार उध्दवराव सरोदे यांची नियुक्ती झाल्याने त्यांचा व पत्रकार संघाचे पदाधिकाऱ्यांचा नांदेड जिल्हा उत्तर व अर्धापूर भाजपाच्या वतीने भाजपाचे नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष अँड.किशोरजी देशमुख यांच्या संपर्क कार्यालयात त्यांच्या हस्ते व नगर पंचायत अर्धापूरचे नगराध्यक्ष प्र. प्रविण देशमुख यांच्या उपस्थितीत अभिनंदन करून सत्कार करण्यात आला.यावेळी पत्रकार संघाचे तालुका तालुका पदाधिकारी बिभिषण कांबळे शिवा संघटनेचे नांदेड जिल्हा सरचिटणीस परमेश्वर लालमे, अविनाश देशमुख चाभरेकर किर्तनकार,नितीन देशमुख,दिव्यांग संघटनेचे जिल्हाध्यक्ष आत्माराम राजेगोरे,नारायण बंडाळे,गजानन गवळी,गजानन वाघ,देविदास देवडे,गंगाप्रसाद वानोडे आदि उपस्थित होते.

# शिक्षक असण्याची पहिली अट 'विद्यार्थी' असणे हीच आहे - विलासराव देशमुख

**आत्ताच एक्सप्रेस**

**अक्कलकोट (रवींद्र मालुसरे)** माणसांचं मोठेपण तो किती मोठा झाला यापेक्षा त्याने किती लोकांना मोठे केले यावर त्यांचे मोठेपण मोजले जाते. शिक्षण देणे हे आपल्या जीवनाचे धेय्य आहे आणि ज्ञानदानाचे समर्पण करणे हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे हे मनोमन स्वीकारलेल्या जंगाले गुरुजींच्या शैक्षणिक सेवा कार्याची महानता भावी पिढीला आदर्शवत अन प्रेरणादायी ठरेल अशीच आहे. शिक्षण हे संस्कृती संवर्धनाचे साधन आहे, तर शिक्षक हा संस्कृतीचा साधक आहे. ही वृत्ती सरांनी आयुष्यभर जोपासली त्याचा मी गेल्या चार दशकांचा साक्षीदार आहे असे उदगार मराठा मंदिर या संस्थेचे उपाध्यक्ष विलासराव देशमुख यांनी काढले. मराठा मंदिर श्रीमंत राणी निर्मला राजे कन्या प्रशाला अक्कलकोट या शाळेचे मुख्याध्यापक श्री.शरद उद्धवराव जंगाले सरांच्या सेवापूर्ती सत्कार समारंभात ते बोलत होते. मोठया संख्येने उपस्थित असलेल्या नागरिक आणि शिक्षकांसमोर जग आणि आधुनिक शिक्षण पद्धती झपाट्याने बदलत असल्याचे मत मांडताना ते आपल्या भाषणात पुढे असेही म्हणाले की, विद्यार्थी जसा निव्वळ परीक्षार्थी असता कामा नये तसा, शिक्षकही निव्वळ 'अर्थार्जनाचे' साधन म्हणून शिक्षण क्षेत्राकडे पाहाणारा असता कामा नये. 'शिक्षक' असण्याची पहिली अट 'विद्यार्थी' असणे हीच आहे.

झपाट्याने बदलणार्या काळात सतत अद्ययावत राहणे हे शिक्षकांसाठी देखील गरजेचे बनले आहे. आज शिक्षणाचे अवमुल्यन केले जात असल्याचे चित्र समाजात दिसत आहे. आमच्यावेळी हे कॉम्प्युटर - मोबाईल नव्हते पण मान मर्यादा आणि पावित्र्य होते. आजचा विद्यार्थी संगणकीय तंत्रज्ञान सहज साध्य करून देशापरदेशात अधिक उच्च पदावर पोहोचत आहे. मात्र गुरू-शिष्य संबंधांमधील पवित्र भावना सध्या लोप पावत आहे. आपल्या मराठा मंदिरच्या मुंबई, अक्कलकोट, जत, पाली, रत्नागिरी येथील सर्व संस्थामधील संस्थाचालक, शिक्षकवर्ग आणि विद्यार्थी परस्परांना पूरक अशी सामंजस्याची भूमिका घेत यशस्वी वाटचाल करीत आहोत त्याचे दृश्य परिणाम दिसत असल्यामुळे उत्तरोत्तर प्रगती होत आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यावर्धिनी मराठा मंदिर मुंबई या संस्थेचे अध्यक्ष योगेश शशिकांत पवार हे होते. तर व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून विद्यावर्धिनी मराठा मंदिर मुंबई या संस्थेचे उपाध्यक्ष संतोषजी नलावडे, चिटणीस मनोहर साळवी, म.मं.श्री. शहाजी हायस्कूलचे माजी मुख्याध्यापक सुरेश फडतरे, विद्यमान मुख्याध्यापक राजेश पडवळकर, म.मं. श्रीमंत राणी निर्मलाराजे कन्या प्रशाला अक्कलकोट या शाळेचे विद्यमान मुख्याध्यापक मानसिंग ल. बनसोडे,

मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईचे अध्यक्ष रवींद्र मालुसरे, मुंबईचे उद्योजक ॲड. यश घोसाळकर, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे उपाध्यक्ष अभयजी खोबरे,

शहाजी हायस्कूलचे माजी मुख्याध्यापक बी. जी. शिंदेआदी मान्यवर उपस्थित होते. जांगळेसरांवर प्रेम करणाऱ्या अनेकांनी याप्रसंगी त्यांच्या कार्याला उजाळा दिला आणि निवृत्ती नंतरच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. संपूर्ण कार्यक्रमावर 'विद्वान सर्वत्र पूज्यते' असा भाव दिसून येत होता.

सत्काराला उत्तर देताना जंगाले सर भावुक शब्दात म्हणाले, शाळेशी माझ्या सोनेरी आठवणी जोडलेल्या आहेत. कोणत्याही व्यक्तीसाठी, त्याचा पहिला कामाचा अनुभव खूप मौल्यवान असतो. या शाळेने मला



शिक्षक म्हणून शिकवण्याची पहिली संधी दिली. त्यावेळी मी नवीन होतो आणि अनुभव नव्हता. पण त्यावेळच्या आमच्या संस्थाचालकांनी आणि मुख्याध्यापकांनी मला नेहमीच साथ दिली. मुलांना नीट कसे शिकवायचे, कमकुवत मुलांना वाचन आणि लेखन कसे शिकवायचे या सर्व महत्त्वाच्या गोष्टी मला सांगितल्या. येथे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी मला नेहमीच भरभरून प्रेम दिले. हे सर्व विद्यार्थी माझे विद्यार्थी नसून माझ्याच मुलांसारखे होते. त्यांना नवीन कौशल्ये शिकवली, त्यांना त्यांचे सर्व ज्ञान निरपेक्षपेपणे देण्याचा आणि उत्तम शिक्षण देण्याचा आम्ही नेहमीच प्रयत्न केला.गेल्या काही वर्षात तर मराठा मंदिर विद्यावर्धिनी कमिटीच्या वतीने सर्वांनी फार प्रेम दिले आपुलकी दिली. आम्हाला त्यांच्याकडून खूप काही शिकायला मिळाले. आम्हाला अधिक शिस्तीने मेहनत करण्याची प्रेरणा मिळाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री शंभुराजे गाटे सर, सौ.अर्चना जाधव मॅडम, तर आभार प्रदर्शन सौ.स्मिता जगदाळे मॅडम यांनी केले.का र्यक्रम आयोजन करण्यात आणि यशस्वी करण्यासाठी प्रशालेचे मुख्याध्यापक श्री मानसिंग बनसोडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली सौ.मनिषा मोरे मॅडम, सौ.प्रमिला पाटील मॅडम, सौ.रेखा चव्हाण मॅडम, सौ.मनिषा तेलगावकर मॅडम, श्री.शहाजी सावंत सर, श्री.विक्रांत गोडसे सर, शिक्षकेतर कर्मचारी श्री.राजेंद्र गोंडाळ, श्रीमती.शारदा साळुंके यांनी विशेष मेहनत घेतली.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज विभाग अभियान अंतर्गत जरंडीत ... श्रमदानातून उभारला वनराई बंधारा...!

**आत्ताच एक्सप्रेस**

**सोयगाव/विजय पगारे /** सोयगाव तालुक्यातील जरंडी ग्राम संसद अंतर्गत ग्रामविकास व पंचायतराज विभाग जिल्हा छत्रपती संभाजीनगर, मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज विभाग अभियानांतर्गत शनिवारी (ता ११) श्रमदानातून वनराई बंधारा उभारण्यात आला.गारगोटी धरणा-पासून उगमस्थान पावलेली खडकी नदितून वाहून जानाऱ्या पाण्याचा शेतकऱ्यांसह गावकऱ्यांना पाण्याचा लाभ घेता यावा म्हणून जरंडी ग्राम संसद अंतर्गत ग्रामविकास व पंचायतराज विभाग जिल्हा छत्रपती संभाजीनगर, मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज विभाग अभियानांतर्गत शनिवारी श्रमदानातून वनराई बंधारा उभारण्यात आला असून परिसरातील शेतकऱ्यांसह गावकऱ्यांना यांचा मोठा लाभ झालेला आहे.




पाणी अडवा पाणी जिरवा या उद्देशाने हा उपक्रम राबवला गेला, ज्याचा फायदा शेतकऱ्यांना होत आहे. या बंधाऱ्यांमुळे सिंचनक्षमता वाढण्यास मदत होत आहे, विशेषतः बांधाऱ्यालगत विहीरीना पाणीटंचाईवर मात करण्यासाठी हे एक प्रभावी उपाय ठरला आहे, तर वनराई बंधाऱ्यांमुळे सिंचनाखालील क्षेत्र वाढले आणि पाणीटंचाईवर मात करता येणे हा फायदा सुध्दा होतोय, कृषी, यांच्या सहकार्याने 'वनराई बंधारा' ही मोहीम राबवली जात आहे.

अनेक गावांमधील नागरिकांनी श्रमदान करून हे बंधारे यशस्वी केले आ-हेत. ग्रामविकास व पंचायतराज विभाग जिल्हा छत्रपती संभाजीनगर, मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज विभाग अभियानांतर्गत ग्रामपंचायत अधिकारी सुनील मंगरूळे यांच्या मार्गदर्शनाखाली विष्णू राठोड, सतीश बावस्कर ,समाधान तुकाराम तायडे, सिद्धार्थ दांडगे आदी ग्रामस्थ मंडळींच्या श्रमदानातून बनराई बंधारा उभारण्यात आला आहे.

# भविष्यातील पाण्याच्या गरजेप्रमाणे योग्य नियोजन करावे- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** गेल्या वर्षीच्या तुलनेमध्ये या वर्षी मोठ्या प्रमाणात पाणीसाठा जिल्ह्यामध्ये मध्यम आणि लघु प्रकल्पामध्ये उपलब्ध आहे. भविष्यातील पाण्याची गरज पाहता काही तालुक्यांसाठी पाणी आरक्षित करण्याचे नियोजन जलसंपदा आणि पाणीपुरवठा विभागाने समन्वयने करावे ,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा अकस्मिक पाणी आरक्षण बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अंकित, जलसंपदा विभागाचे अधी-क्षक अभियंता श्री सब्बीनवार, अपर जिल्हाधिकारी संभाजी अडकुने,निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते ,महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अभियंता विजय कोळी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रकाश देशमुख,यांच्यासह जिल्हा परिषद महानगरपालिका यांच्या पाणीपुरवठा विभागाचे संबंधित अधिकारी या बैठकीस उपस्थित होते.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पाटबंधारे, जलाशयातील आकस्मिक, आणि पिण्याच्या पाण्याच्या गरजेची निश्चिती करण्या साठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. गेल्या वर्षीच्या तुलनेमध्ये आजपर्यंत जिल्ह्यातील मध्यम आणि लघु प्रकल्पातील पाणीसाठा एकूण ९४% आहे. गत वर्षी हा पाणीसाठा २८% होता .भविष्यात गंगापूर आणि वैजापूर तालुक्यातील उन्हाळ्यामध्ये पाण्याची आवश्यकता भासू शकते या अनुषंगाने




जलसंधारण आणि पाणीपुरवठा विभागाने १२२ गावांसाठी ३०.५७५ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा आरक्षित करण्याचे नियोजन केलेले आहे. हे आरक्षित पाणी नांदूर मधमेश्वर पाणी प्रकल्पातून करण्यात आले आहे. तसेच छत्रपती संभाजीनगर करिता एकुण ३५.०४ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा आरक्षित करण्याचे नियोजन केलेले आहे.जिल्ह्यात लहान आणि मोठ्या प्रकल्पाचे मिळून एकत्रित पाणीसाठा हा जिल्ह्याच्या गरजेनुसार आरक्षित केला जातो .यामध्ये पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देऊन इतर पाणी हे सिंचनासाठी वापरले जाते.

# निवडणूक कामात सोशल मिडीया तसेच प्रिंट व डिजिटल मिडीयाचा पुरेपुर वापर करा - स्वराज्य जनजागृती परीषद

**आत्ताच एक्सप्रेस**

**पैठण/ प्रतिनिधी/** स्थानिक स्वराज्य संस्थेचा निवडणूक कार्यक्रम जाहीर होऊन दोनच दिवस उलटले असुन शहरात सगळीकडे विविध चर्चांना उत आला आहे. यामध्ये अनेक मतदारांनी नावे इतर वार्ड/प्रभागात हलली असल्याने तर काहींची नावे दुबार असल्याने मतेच पळवल्याची नाहक चर्चा सोशल मिडीयावर होतांना दिसत आहे. त्यात भरीस भर म्हणजे सद्यकाळात बिहार निवडणूकीतील वोटचोरीचा आरोप पैठण शहरातही काही जण करतांना दिसत आहेत.




सदर चर्चेवर समाधानकारक खुलासा व्हावा म्हणून कोणत्याही कार्यालयातील सक्षम अधिकारी पुढाकार घेतांना सध्या तरी दिसत नसल्याने निवडणूक अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी तसेच तहसीलदार, मुख्याधिकारी आदींनी स्वतः हून सोशल मिडीयावरील चर्चेत सहभागी होऊन खुलासा करावा, अशा आशयाचे निवेदन स्वराज्य जनजागृती परीषदेच्या वतीने दि.१० रोजी तहसील निवडणूक विभागाच्या नायब तहसीलदार श्रीमती कांबळे यांना देण्यात आले. निवेदनात मतदार यादी संदर्भात आलेल्या आक्षेप अर्जांची जाहीर सुनावणी घ्यावी, केवळ कर्मचा-यांवर अवलंबून न राहता स्वतः सहभाग घेऊन शहरातील विविध व्हाट्सअप ग्रुपमध्ये सक्रिय सहभागी असावे, शक्य तितक्या सोशल मिडीयाचा पुरेपुर वापर करुन आपला कारभार पारदर्शक करावा, शक्य तितका प्रिंट व डिजिटल मिडीयाचा वापर वाढवून सर्वसामान्यांपर्यंत निवडणुकीच्या प्रत्येक सूचना व हरकती नोटीस बोर्ड वर लाऊन त्यांचे फोटो सुद्धा सोशल मीडिया वर पाठविण्याची व्यवस्था करावी, मतदान प्रक्रियेसाठी नागरिकांच्या सूचना व अडचणी सोडविण्यासाठी अधिकृत मोबाईल किंवा लॅण्डलाइन नंबर जाहीर करुन कार्यालयात मदतकक्ष/चौकशी कक्ष स्थापन करावे. तसेच या ठिकाणी सक्षम अधिकारी नियुक्त करावा आदी मागण्या करण्यात आल्या आहेत. याप्रसंगी स्वराज्य जनजागृती परीषदेचे विश्वस्त विष्णू ढवळे, शेख रईस, विष्णू सोनार, गणेश जुंजे, ईश्वर मोरे, भाऊसाहेब पठाडे, राजेंद्र बडसल आदी उप-स्थित होते.

# गुरुदेव समंतभद्र विद्या मंदिर मध्ये सामान्य ज्ञान स्पर्धेचे बक्षीस वितरण संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद /प्रतिनिधी/** खुलताबाद तालुक्यातील वेरूळ: येथील गुरुदेव समंतभद्र विद्या मंदिर मध्ये प्रशा-लेचे क्रीडा शिक्षक आशिष देवकुमार कान्हेड यांच्या मातोश्री जया देवकुमार कान्हेड यांच्या स्मरणार्थ गत पंधरा वर्षा पासून सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षेचे ज्ञान व्हावे या अपेक्षेने संपूर्ण शालेय स्तरावर स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. यासाठी प्रशालेतून सर्व शिक्षकांचा प्रायोजक म्हणून सहभाग असतो आज या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ अत्यंत उत्साहात पार पडले . यावेळी आयोजित कार्यक्रमात अध्यक्ष स्थानी प्रशालेचे माजी मुख्याध्यापक निर्मल कुमार ठोले हे अध्यक्षस्थानी होते.तर प्रमुख अतिथी म्हणून चैतन्य कुमार वायकोस, चंदना वायकोस, सचिन चतुर,रमेश चतुर सुनंदा चतुर, सुभाष चतुर, आशिष कान्हेड, तसेच संगीता गवळी प्रशालेचे मुख्याध्यापक गुलाबचंद बोराळकर पर्यवेक्षक सुकमार नवले यांची उपस्थिती होती.यावेळी दैनंदिन



परिपाठ अंतर्गत विद्यार्थ्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. सामान्य ज्ञान स्पर्धेमध्ये माध्यमिक विभागातून व प्राथमिक विभागातून गुणानुक्रमे प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना स्मरण चिन्ह व रोख राशी देऊन गौरव करण्यात आला. यावेळी प्राथमिक गटातून तेजल योगेश गुशिंगे, स्वरा युवराज काळे, शिवम सदाशिव साबळे, तर माध्यमिक गटातून प्रांजल परमेश्वर पगारे, पवन धारासिंग राठोड, रोहन रमेश धरणे या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे प्रथम द्वितीय तृतीय क्रमांक प्राप्त केला तसेच प्रत्येक वर्गातून सामान्य ज्ञान स्पर्धेच्या प्रश्नांची उत्कृष्ट वही लेखन करणाऱ्या १५८ विद्यार्थ्यांना गौरवांवित करण्यात आले. या यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक गुलाबचंद बोराळकर यांनी केले तर उप-स्थित मान्यवरांना मध्ये विद्यार्थ्यांना प्रोत्स-ाहन म्हणून रोख स्वरूपात पारितोषिकांची घोषणा केली. या स्पर्धेसाठी सहप्रायोजक म्हणून निर्मळ ठोले गुलाबचंद बोराळकर सुकुमार नवले शोभा देशमाने सुहास निश्चित घोटकर महेंद्र वाकळे, दीपक जैन, सचिन अन्नदाते, कैलास गोरे, सिद्धी दगडे, सुरज मेहेत्रे, प्रतिभा गंगवाल, प्रदीप माद्रप, प्रतीक्षा दगडफोडे, संतोष जैन यांनी सहप्रयोजकत्व स्वीकारले होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेंद्र वाकळे व राजकुमार नरखडे यांनी केले तर आभार प्रदर्शन जयश्री पाटणी यांनी केले.

# आत्महत्याग्रस्त आणि अतिवृष्टीबाधित शेतकरी कुटुंबांना शासकीय योजनेचा लाभ प्राधान्याने द्या - निलेश हेलोंडे पाटील

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** मराठवाड्यात झालेल्या अतिवृष्टी बाधित शेतकऱ्याच्या पशूधनास चारा उपलब्ध व्ह-ावा यासाठी पशुसंवर्धन,कृषी विभागआणि रोहयो यांच्या संयुक्त विद्यमाने उपाययोजना करून चारा उपलब्ध करून द्यावा, तसेच आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबातील सदस्यांना जिल्हा अग्रणी बँकेच्या ग्रामीण प्रशिक्षण केंद्रअंतर्गत प्रशिक्षण उपलब्ध करून द्यावे असे निर्देश वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ड. निलेश हेलोंडे पाटील यांनी आज बैठकीत दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनच्या कार्यालयात आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीस रोहयोच्या उपजिल्हाधिकारी सुचिता शिंदे ,जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रकाश देशमुख, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी नानासाहेब कदम, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्थेचे उपनिबंधक समृद्ध जाधव ,शिक्षण उपसंचालक प्रकाश मुकुंद, सामाजिक वनीकरण विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मराठवाड्यातील अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मदत व्हावी ,त्यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ करण्याबरोबरच शिक्षण आणि प्रशिक्षण याच्या माध्यमातून रोजगार, उप-लब्ध करुन आर्थिक सक्षमीकरण करण्याचा प्रयत्न वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन अंतर्गत करण्यात येतो.

यासाठी कृषी विभाग, पशुसंवर्धन, सहकार त्याचप्रमाणे रोजगार हमी योजना यांच्या अंतर्गत असणाऱ्या विविध योजनांचा लाभ शेतकऱ्यांच्या पशुधनासाठी चारा उपलब्धता, आत्महत्याग्रस्त कुटुंबियांच्या पाल्यांना प्रशिक्षणातून रोजगार तसेच कर्जमाफी संदर्भात असलेल्या शासन निर्णयाप्रमाणे लाभ देण्याचे सूचना ड. हेलोंडे पाटील यांनी बैठकीत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. अकरावी ते पदवी पर्यंतच्या शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयामध्ये स्नेहसंमेलनासाठी विद्यार्थ्यांकडून फीस किंवा शुल्क आकारले जाऊ नये याबाबत शिक्षण विभागाने



योग्य ते निर्देश संबंधित शाळा, महाविद्यालय देण्याचे सुचित करण्यात आले. जिल्हा अग्रणी बँकेच्या माध्यमातून ग्रामीण प्रशिक्षण संस्थेंच्या अंतर्गत विविध व्यावसायिक अभ्यासक्रमाचे मोफत प्रशिक्षण, निवास व्यवस्थासह उपलब्ध असल्याने आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबातील पाल्यांना यामध्ये प्राधान्य देऊन प्रशिक्षणाचा लाभ द्यावा तसेच त्यांना आर्थिक सक्षमीकरणासाठीचे व्यवसायाचे प्रशिक्षण देण्याचे निर्देश देण्यात आले.

जिल्ह्यात उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालयाच्या अंतर्गत ११६ एकर जमीन अवैध सावकारी पाशातून मुक्त करून मूळ शेतकऱ्यांना जमीन उपलब्ध करून दिल्याबद्दल सहकार विभागाचे हेलोंडे पाटील यांनी अभिनंदन केले.

शेतकऱ्यांच्या पशुधनासाठी चारा उपलब्ध व्ह-ावा यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीच्या पुढाकारातून चारा लागवड करून शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्यावे. यामध्ये भूमिहीन शेतमजुरांना रोजगार उपलब्ध करून द्यावा व यासाठी विस्तार अधिकाऱ्यांमार्फत ग्रामपंचायतची निवड करून आवश्यक ठिकाणी भूमिहीन मजुरांना याबाबतचा निधी देण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले.

# अपंग जनता दल सामाजिक संघटनेची राज्य कार्यकारिणी जाहीर

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/प्रतिनिधी/** अपंग जनता दल सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्री. अनिस पत्रकार यांच्या हस्ते नियुक्ती पत्र वाटप करण्यात आले. अपंग जनता दल सामाजिक संघटना असून अपंगांच्या न्याया हक्कासाठी शासन व प्रशासना सोबत लढा देत असते या लढाई मध्ये राज्यातील अनेक अपंग सहभागी होत राहतात. राज्यातील अपंगांचा आवाज बुलंद करण्यासाठी अपंग जनता दल सामाजिक संघटनेची महाराष्ट्र राज्याची सन २०२५-२६ ची राज्य कार्यकारिणी खालील प्रमाणे जाहीर करण्यात आली. यामध्ये महाराष्ट्र राज्याध्यक्ष श्री. जाकीर शेख, (औरंगाबाद) तर राज्य महिला अध्यक्षा पदी मीनताई धोत्रे, (पुणे) व राज्य कार्याध्यक्ष पदी भाऊसाहेब दसपुते, (जालना), राज्य संपर्क प्रमुख श्री. लक्ष्मण वाघे, राज्य महासचिव पदी श्री. राजिक शाह, (अमरावती) राज्य सचिव पदी श्री. शेख कलीम, (बुलाढाना) तर राज्य उपाध्यक्ष पदी श्री. कृष्णा राऊत, ( पालघर ), राज्य उपाध्यक्ष श्री. फैजल शेख, (रत्नागिरी), राज्य उपाध्यक्ष पदी श्री. कुणाल झालटे, ( जळगाव) राज्य उपाध्यक्ष पदी श्री. गणेश मगर, ( पुणे) राज्य कार्यकारिणी सदस्य पदी श्री. नूर चौधरी, ( जालना) जयराम महाराज (वाशिम) श्री. सलीम शेख, (पुणे), युसूफ तांडेल, (रत्नागिरी), श्री. दिपक जाधव, (यवतमाळ) या प्रमाणे अपंग जनता दल सामाजिक संघटनेची राज्य कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. व रिक्त असलेले २-३ राज्य उपाध्यक्ष पद लवकरच जाहीर करण्यात येईल अशी माहिती संस्थापक अध्यक्ष श्री. शेख अनिस पत्रकार, यांनी एका अधिकृत पत्रा द्वारे दिली.

# स्वच्छ ग्राम स्पर्धेत जरंडी छ .संभाजीनगरात आली अव्वल, स्वच्छता अभियानात तिसऱ्यांदा मिळवला मानाचा तुरा

**आत्ताच एक्सप्रेस**

**सोयगाव /प्रतिनिधी/** सोयगाव तालुक्यातील जरंडी ग्रामपंचायतीचा संत गाडगेबाबा स्वच्छ ग्राम स्पर्धांमध्ये इ. स. २०२४-२५ मध्ये स्वच्छतेत १८१ इतके गुण मिळवून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात अव्वल ठरली आहे दरम्यान जरंडी ग्रामपंचायतीला तिसऱ्यांदा हा स्वछ ग्राम पुरस्कार मिळाला आहे त्यामुळे स्वच्छतेत जिल्ह्यात जरंडीचा तोरा कायम आहे शुक्रवारी सायंकाळी सात वाजता जाहीर झालेल्या स्पर्धे च्या निकालात जरंडी अव्वल ठरली आहे सरपंच स्व-ाती पाटील,उपसरपंच संजय पाटील,वंदनाताई पाटील,मधुकर पाटील, कृषिभूषण रवींद्र पाटील,दिलीप पाटील,संजीवन सोनवणे, अमृत राठोड,आशा सेविका, अंगणवाडी सेविका, आरोग्य विभाग आदींचा या कामात सहभाग असल्याचे ग्रामपंचायत अधिकारी सुनील




मंगरुळे यांनी सांगितले दरम्यान जरंडी ग्रामपंचायतीची जिल्हास-तरीय स्पर्धेत अव्वल झाल्याची घोषणा होताच गटविकास अधिकारी शिवाजी यमुलवाड तहसीलदार मनीषा मेने, तालुका आरोग्य अधिकारी डॉ गीतेश चावडा आदींनी अभिनंदन केले आहे ग्रामपंचायत अधिकारी सुन-ील मंगरुळे,संतोष पाटील,सतीश बाविस्कर, अंबु राठोड,आदींनी पुढाकार घेतला होता.

# भजन स्पर्धेत महावितरणची उत्कृष्ट कामगिरी सांघिक सर्वोत्कृष्ट तृतीय पारितोषिक

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/** कामगार कल्याण मंडळ छत्रपती संभाजीनगर गट कार्यालयाच्या वतीने उस्मानपुऱ्यातील ललित कला भवनात 'पुरुष भजन स्पर्धा २०२५-२६' पार पडली. या स्पर्धेत महावितरणच्या संघाने लक्षणीय यश मिळवले. स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यातील कामगारांच्या एकूण तेरा संघांनी सहभाग घेतला. स्पर्धेत महावितरणच्या संभाजीनगर परिमंडलाचा परिपूर्ण संघ या स्पर्धेत तिसऱ्यांदा सहभागी झाला आणि सांघिक तृतीय पारितोषिक पटकावले.

या संघास मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांचे मार्गदर्शन तर उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी विश्वास पाटील यांचे सहकार्य



लाभले. या संघात नवनाथ पवार, रमेश शिंदे, डॉ.सुधाकर जायभाये, राजेश्वर सूर्यवंशी, वैभव साखरे, अभय एरंडे, भानुदास शेवाळे, अरुण दुबाले, दिगंबर रेंगे, लक्ष्मण वाघ, सदानंद जाधव, दिलीप चंदनशिव व मृदंगवादक जीवन पवार यांचा समावेश होता. भजन संघाचे महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह कामगार कल्याण मंडळाच्या कोतवालपुरा केंद्राचे संचालक जिग्नेश पाटील यांनी अभिनंदन केले. या भजन संघाला वीज उद्योगासह विविध स्तरातून शुभेच्छा दिल्या जात असून, उत्कृष्ट सादरीकरणाबद्दल संघाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष हेडगेवार रुग्णालयाचे मुख्य मानव संसाधन अधिकारी रवींद्र कोल्हारकर, प्रमुख पाहुणे स्टरलाईट इंडियाचे मुख्य मानव संसाधन अधिकारी रोहित पाटील, कामगार कल्याण मंडळाचे प्रभारी सहायक कल्याण आयुक्त भालचंद्र जगद-ाळे व कामगार केंद्र संचालक यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

## संक्षिप्त

# वानर, माकडे इत्यादी वन्यप्राण्यांना घरगुती अन्न देण्याचे दुष्परिणाम

**कन्नड वनविभागाची वन्य प्राण्यांबाबत जनजागृती मोहीम.**

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड /उदय कुलकर्णी/** डोंगरदऱ्यात निसर्गाच्या कुशीत मनसोक्त व भीतीमुक्त जीवन व्यथित करणारी माकडे, वानर, हरीण किंवा इतर कोणत्याही वन्यजीवांना - विशेषतः घरगुती किंवा रासायनिक प्रक्रिया केलेले अन्न - खायला दिल्याने गंभीर पर्यावरणीय, वर्तणुकीय आणि आरोग्याशी संबंधित दुष्परिणाम होऊ शकतात.असे कुठलेही आजार व दुष्परिणाम त्यांचे जीवितास होऊच नये म्हणून कन्नड प्रादेशिक वनपारिक्षेत्र अधिकारी श्री.शिवाजी टोम्पे यांनी नागरिकांना केले असुन पुढे त्यांनी अशीही माहिती पुढीलप्रमाणे दिली आहे:

१. वन्यप्राण्यांच्या वर्तणुकीत बदल

नैसर्गिक चारा शोधण्याच्या कौशल्यांचा तोटा: मानवी अन्नावर अवलंबून राहणारे प्राणी त्यांची प्रवृत्ती आणि नैसर्गिक अन्न स्रोत शोधण्याची क्षमता गमावतात.

सवय: वन्यप्राणी मानवांबद्दलची भीती गमावतात आणि ते लोकांजवळ, वाहने किंवा घरांजवळ जवळ येऊ लागतात, ज्यामुळे मानव वन्यजीव संघर्ष निर्माण होतात.

आक्रमकता:माकडे आणि इतर वन्य प्राण्यांना मानवी खाद्य पदार्थांची सवय लागल्यावर तर पुन्हा पुन्हा खाद्यपदार्थांची अपेक्षा करतात आणि जेव्हा ते मिळत नाही तेव्हा ते अनेकदा आक्रमक होतात, मानवांवर हल्ला करतात किंवा वस्तू हिसकावून घेतात.

**२. आरोग्य समस्या**

**पोषण असंतुलनः** मानवी अन्नात मीठ, साखर, तेल आणि मसाले जास्त असतात - ह्यासारखे रासायनिक घटक वन्यप्राण्यांचे शरीर योग्यरित्या प्रक्रिया वं पचन करू शकत नाही.

आजार: जंक किंवा शिजवलेले अन्न वन्यप्राण्यात लठ्ठपणा, दातांच्या समस्या, पचन समस्या आणि त्यांच्या कुपोषणाचे कारण बनू शकते.




रोगाचा प्रसार: आहार दिल्याने मानव आणि वन्यजीवांमधील जवळचा संपर्क वाढतो, ज्यामुळे झुनोटिक रोगांचा धोका वाढतो (उदा. रेबीज, क्षयरोग, सिमियन विषाणू).

**३. पर्यावरणीय परिणाम**-वन्यप्राण्यांच्या नैसर्गिक वर्तनात नकारात्मक बदल: जेव्हा प्राणी रेडिमेड मानवी खाद्य पदार्थांवर अवलंबून असतात, तेव्हा ते स्वतःसाठी नैसर्गिक अन्न शोधण्यात कमी वेळ घालवतात, त्यांची नैसर्गिक पर्यावरणीय भूमिका बदलतात (जसे की बियाणे पसरवणे).

**खाद्य क्षेत्रांमध्ये जास्त लोकसंख्याः** एकाग्र आहारामुळे वन्य प्राण्यांच्या अनैसर्गिक संख्येची घनता निर्माण होते, ज्यामुळे विविध प्राणी प्रजातींमध्ये संघर्ष आणि ताण येऊ शकतो.अधिवासाचा ऱ्हास: मानवी क्षेत्रांकडे ओढलेले प्राणी वनस्पती, कचरा जागा खराब करतात आणि कचरा पसरवू शकतात.

**४. मानव-वन्यजीव संघर्ष**

**मालमत्तेचे नुकसानः** माकडे आणि इतर वन्यजीव अन्नाच्या शोधात घरांमध्ये, वाहनांमध्ये किंवा कार्यालयांमध्ये प्रवेश करू शकतात.

**रस्ते अपघातः** रस्त्यांजवळ अन्न दिल्याने प्राण्यांना तिथेच राहण्यास प्रोत्साहन मिळते, ज्यामुळे वन्यप्राणी वाहनांना धडकण्याचा व अपघात घडण्याचा धोका वाढतो.

५. कायदेशीर आणि नैतिक परिणाम उदाहरणार्थ, भारतात, सार्वजनिक ठिकाणी वन्य प्राण्यांना (जसे की माकडे) खायला घालणे वन्यजीव संरक्षण कायदा, १९७२ अंतर्गत निषिद्ध किंवा प्रतिबंधित आहे, कारण ते त्यांच्या नैसर्गिक वर्तनात बदल करते आणि ते वन्यप्राण्यांवर होणाऱ्या छळाचे एक प्रकार म्हणून पाहिले जाऊ शकते.नैतिकदृष्ट्या, वन्यप्राण्यांना मानवी खाद्यपदार्थ खायला देण्यामुळे नैसर्गिक परिसंस्थांमध्ये आणि वन्यप्रजातींच्या स्वयंपूर्णतेमध्ये अडथळा येते.

**उपाययोजनाः**वन्यजीवांना मानवी खाद्यपदार्थ देण्याच्या दुष्परिणामांबद्दल इतरांना शिक्षित करा.मानवी वस्तीपासून दूरच्या मोकळ्या जागेत स्थानिक फळझाडे लावून नैसर्गिक अधिवासांना पाठिंबा द्या.मानवी वस्तीपासून दूरच्या मोकळ्या जागेत कोरड्या हंगामात (उन्हाळ्यात) पाण्याचे स्रोत उपलब्ध करा.मानवी वस्त्यांकडे येण्याची किंवा मानवी खाद्यपदार्थाची सवय लागलेल्या किंवा आक्रमक वर्तणूक करत असलेल्या वन्यप्राण्यांची तक्रार स्थानिक वन किंवा वन्यजीव विभागाला करा.असे आवाहनही टोम्पे यांनी नागरिकांनाकेले आहे.

# ८ व्या वार्षिक निरंकारी संत समागमाची व्यापक पूर्वतयारी

## मुंबईसह महाराष्ट्रातील हजारो स्वयंसेवक समर्पित करत आहेत त्यांच्या निष्काम सेवा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/** संत निरंकारी मिशनचा ७८ वा वार्षिक संत समागम, गतवर्षांच्या दिव्यता आणि गौरवशाली परंपरेशी सुसंगत राहून, या वर्षीही ३१ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर, २०२५ दरम्यान संत निरंकारी आध्यात्मिक स्थळ, समालखा (हरियाणा) येथे अत्यंत भव्यरूपात, श्रद्धापूर्ण आणि आध्यात्मिक उत्साहात साजरा होणार आहे. हा दिव्य सोहळा सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज आणि निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पवित्र सान्निध्यात संपन्न होणार असून, या आनंदवार्तेने सर्व श्रद्धाळू भक्तांच्या अंत:करणात अगणित हर्ष आणि आध्यात्मिक ऊर्जा संचारली आहे.या वर्षीचा वार्षिक समागम आत्ममंथन या विषयावर आधारित आहे. हा समागम म्हणजे भक्तांसाठी एक अद्वितीय अध्यात्मिक प्रवास आहे, जिथे ते ब्रह्मज्ञानाच्या आत्मिक प्रकाशात सेवा, नामस्मरण आणि सत्संगाच्या माध्यमातून आनंद व प्रेमाभक्तीचा अनुभव घेतील.या दिव्य उत्सवाची तयारी अत्यंत श्रद्धा, निष्ठा आणि निस्वार्थ भावनेने केली जात आहे. श्रद्धाळू भक्तगण वयस्कर असो वा युवा, पुरुष असो किंवा स्त्रिया सर्वजण मनोभावे सेवेत मग्न आहेत. समागमस्थळी पहाटेच्या पहिल्या किरणापासून ते सायंकाळच्या संध्या प्रकाशापर्यंत प्रत्येक ठिकाणी भक्तिभावाने समर्पित सेवेचे अलौकिक दृश्य दिसून येत आहे. इथे कोणी माती उचलत आहे, कोणी निवासी तंबू बांधत आहे, कोणी स्वच्छता करत आहे तर कोणी पाणीपुरवठा व भोजन व्यवस्थेची सेवा पाहतो आहे. मुंबई व महाराष्ट्रातून हजारो स्वयंसेवक समागमाच्या पूर्वतयारीसाठी आपल्या निष्काम सेवा समर्पित करत आहेत.७८ व्या वार्षिक संत समागमाची भव्यता दर्शवणारे मुख्य प्रवेशद्वारही आता आकार घेऊ लागले आहे, जे प्रेम, समरसता आणि आत्मिक एकत्वाच्या यात्रेचे प्रतीक ठरणार आहे. हे सर्व त्या समर्पण भावनेचे प्रमाण आहे, जी सतगुरुंच्या ज्ञानातून उत्पन्न होते. जसे म्हटले गेले आहे, की जिथे



सेवेत समर्पण असते, तिथे प्रत्येक क्षण उत्सव बनतो.सेवाभावाच्या या अद्वितीय दृश्यात स्पष्टपणे जाणवते, की या सेवादारांच्या चेहर्यावर थकवा नव्हे, तर आनंद आणि उत्साहाचे तेज झळकत आहे. हा तोच दिव्य आनंद आहे, जो फक्त सतगुरुंच्या छत्रछायेत राहून सेवा आणि भक्तीच्या माध्यमातून अनुभवता येतो. सतगुरु माताजी सुद्धा नेहमी आपल्या प्रवचनांमधून प्रेरणा देतात, की तन पवित्र सेवा केली, धन पवित्र दिले दान, मन पवित्र हरिभजनाने, त्रिविध होई कल्याण.समागमात केवळ देशाच्या कानाकोपर्यातूनच नव्हे, तर विदेशांतूनही लाखो श्रद्धाळू भक्तगण सहभागी होण्यासाठी येतात. त्यांच्या स्वागत आणि सुविधांसाठी सर्व आवश्यक व्यवस्था अत्यंत काटेकोर आणि नियोजनबद्ध पद्धतीने केली जात आहे. रेल्वे स्थानके, बसस्थानके आणि विमानतळांवर निरंकारी सेवादलाचे अनुशासित व सुसज्जित सेवक आपल्या निळ्या व खाकी गणवेशात, श्रद्धाळूंचे आदरपूर्वक स्वागत करून त्यांना समागमस्थळी पोहोचवण्यासाठी सतत तत्पर राहतील. निःसंशयपणे, हा समागम केवळ एक साधारण धार्मिक कार्यक्रम नसून मानवतेच्या उत्थानाचा आणि समरसतेच्या जागृतीचा एक अनुपम उत्सव आहे जिथे विविध संस्कृती, भाषा आणि प्रांतातून आलेले श्रद्धाळू भक्तगण वसुधैव कुटुंबकम या भावनेला आत्मसात करून, सतगुरुंच्या अमृतवाणीमधून आपले अंतःकरण प्रकाशमय करतील. या पवित्र प्रसंगी अशा सर्व सज्जन, बंधु-भगिनी यांचे मन:पूर्वक स्वागत आहे, जे प्रेम, शांती आणि समरसतेच्या या दिव्य महायज्ञाचा भाग बनू इच्छितात.

# अंबड-घनसावंगी तालुक्यांत आज पोलीस पाटील भरती परीक्षा

**- प्रशासन सज्ज, गैरप्रकार रोखण्यासाठी कडक उपाययोजना**

**आत्ताच एक्सप्रेस**

**घनसावंगी/ प्रतिनिधी/** अंबड उपविभागातील अंबड व घनसावंगी तालुक्यांमधील रिक्त असलेल्या १८३ पोलीस पाटील पदांच्या भरतीसाठीची लेखी परीक्षा उद्या, रविवार, दि. १२ ऑक्टोबर २०२५ रोजी होणार आहे. या परीक्षेसाठी दोन्ही तालुक्यांतील एकूण १८६९ उमेदवार प्रविष्ट होणार असून, परीक्षेचे आयोजन जालना येथील सहा परीक्षा केंद्रांवर करण्यात आले आहे.

ही परीक्षा प्रक्रिया अत्यंत पारदर्शक, निःपक्षपाती आणि सुरक्षित वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासनाने सर्वंकष तयारी केली आहे. तहसीलदार अंबड विजय चव्हाण आणि घनसावंगी पूजा वंजारी घनसावंगी यांच्या नेतृत्वाखाली परीक्षा प्रक्रिया राबवली जाणार असून, उपविभागीय अधिकारी अंबड उमाकांत पारधी तसेच जिल्हाधिकारी जालना यांच्या थेट नियंत्रणाखाली ही परीक्षा होणार आहे.सीसीटीव्ही आणि वेबकास्टिंग: सर्व परीक्षा केंद्रांवर तसेच प्रत्येक हॉलमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले असून परीक्षेचे थेट वेबकास्टिंग होणार आहे.उमेदवारांची व्हिडिओग्राफी: प्रवेशावेळी आणि परीक्षा सुरू असताना प्रत्येक उमेदवाराची स्वतंत्र व्हिडिओग्राफी केली जाणार आहे.भरारी पथके: आकस्मिक तपासणीसाठी व गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी विशेष भरारी पथके नियुक्त करण्यात आली आहेत.पोलीस बंदोबस्त: सर्व परीक्षा केंद्रांवर पोलीस बंदोबस्त तैनात करून सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे.

**उमेदवारांसाठी प्रशासनाचे आवाहन**

भरती प्रक्रिया पूर्णपणे गुणवत्तेच्या आधारेच होणार असल्याने कोणत्याही व्यक्तीच्या, दलालाच्या किंवा मध्यस्थाच्या आमिषाला बळी पडू नये, असे प्रशासनाने आवाहन केले आहे. कोणतीही अवैध मदत, नोकरी लावण्याचे आश्वासन इत्यादी प्रकार तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांना कळवावेत, असेही सांगण्यात आले आहे.

**गैरप्रकारांवर कठोर कारवाई**

परीक्षेदरम्यान कॉपी करणे, तोतयागिरी, बनावट कागदपत्रे तयार करणे किंवा इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा वापर आढळल्यास संबंधित उमेदवारावर तात्काळ फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल महाराष्ट्र परीक्षा गैरप्रकार प्रतिबंध अधिनियम, १९८२ अंतर्गत कारवाई केली जाईल.भारतीय दंड संहिता कलम ४१९, ४२०, ४६५, ४६८, १२०-ब नुसार गुन्हा नोंदवला जाईल.

दोषी उमेदवाराला पुढील सर्व शासकीय भरती परीक्षांसाठी काळ्या यादीत (Blacklist) समाविष्ट केले जाणार आहे. तहसीलदार पूजा वंजारी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे ही माहिती दिली असून, परीक्षा शांततेत व प्रामाणिकपणे पार पडावी यासाठी नागरिक आणि उमेदवारांच्या सहकार्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

# शेतकऱ्यांच्या प्रश्नी शिवसेनेचा आवाज दणाणला

## शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमुक्त करून अतिवृष्टीग्रस्त शेतकर्यांना भरीव मदत द्या -जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर

**शिवसेनेचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र निदर्शने**

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/** जालना जिल्ह्यात झालेल्या अभूतपूर्व अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील शेतकर्यांची संपूर्ण कर्जमुक्ती करून अतिवृष्टीग्रस्ताना भरीव मदत देण्याची मागणी जालना जिल्हा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर, माजी आमदार संतोष सांबरे यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांची प्रत्यक्ष भेट घेऊन केली. यावेळी उपस्थित पदाधिकार्यांनी तीव्र निदर्शने करीत जिल्हाधिकारी कार्यालयात प्रचंड घोषणाबाजी करून कार्यालय दणाणून सोडले. या शिष्टमंडळात जिल्हासंघटक भानुदास घुगे,उपजिल्हाप्रमुख भगवानराव कदम,मुरलीधर शेजूळ,माजी सभापती मुरलीधर थेटे, तालुकाप्रमुख हरिहर शिंदे,जयप्रकाश चव्हाण, माजी जिप सदस्य बबनराव खरात, शहरप्रमुख बाला परदेशी, घनशाम खाकीवाले, दुर्गेश काठोटीवाले, प्रभाकर उगले, बाबुराव कायंदे आदींचा समावेश होता. यावेळी निवेदन करतांना जिल्हाप्रमुख अंबेकर म्हणाले की, मागील काही दिवसात जालना जिल्ह्यातील सर्वच मंडळात प्रचंड मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी झाली. या अतिवृष्टीमुळे जालना जिल्ह्यातील शेतकर्यांचे जनजीवन पूर्णतः विस्कळीत झाले. शेतकर्यांची सोयाबीन, कपाशी, तूर, फळबाग आदी पिके पूर्णतः हातची गेली. अगोदरच पेरणी-मशागतीसाठी शेतकर्यांनी सरकारी, खाजगी बँका व इतर मार्गाने कर्ज काढून केलेला खर्च पूर्णतः वाया गेला आहे.

अशा अडचणीतील शेतकर्याला दिलासा देण्यासाठी सरकारने अत्यंत खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभे राहणे गरजेचे होते परंतु विरोधी पक्षाच्या व संघटनांच्या दबावामुळे सरकारने मंगळवारी नुकतीच मदतीची घोषणा केली. सरकारने घोषित केलेली मदत ही अतिशय तुटपुंज्या स्वरुपाची आहे. मराठवाड्यात झालेल्या प्रचंड अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर शेतकर्यांना भरीव मदत मिळणे गरजेचे असल्याचे सांगितले. तर पक्षाच्या वतीने पुढील प्रमाणे मागण्या यावेळी जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात आल्या. जिल्ह्यासह राज्यातील सर्वच शेतकर्यांना सरसगट कर्जमुक्त करण्यात यावे, सर्व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करण्यात यावे, शेतकर्यांना मिळणारी मदत सरसकट असावी जेवढे खातेदार असतील त्या सर्वांना मदत मिळावी कोणीही वंचित राहू नये, अतिवृष्टी व पुराने वाहून गेलेल्या जनावरांचा पोस्टमार्टम रिपोर्ट देणे अशक्य




असल्यामुळे सदर जाचक अट रद्द करावी, नुकसान मोठ्या प्रमाणावर झाल्याने जाहीर प्रती हेक्टरी १७ हजार व २७ हजार ही मदत वाढवून प्रती हेक्टरी ५० हजार रुपये करण्यात यावी, शहरी भागातही अनेक वस्त्यांत पाणी घुसले तेथील घरांची पडझड झाली त्यांनाही मदत देण्यात यावी, मदतीत फळबागांचा उल्लेख नाही त्यांना प्रती हेक्टरी एक लाख रुपये या प्रमाणे मदत करण्यात यावी.अतिवृष्टीने रस्त्यांचे ही प्रचंड मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून त्यांची ही दुरुस्ती करण्यात यावी. पिक विम्याचे निकष शिथिल करून त्वरित शेतकर्यांना लाभ देण्यात यावा, छोटे-मोठे तळे बंधारे फुटल्यामुळे त्यांच्या दुरुस्तीसाठीही निधी उपलब्ध करून देण्यात यावा, अद्यापही अनेक मंडळातील अतिवृष्टीचे पंचनामे झालेले नाहीत ही प्रक्रिया अत्यंत संथ गतीने सुरू असून सदरील पंचनामे लवकरात लवकर करण्यात यावे, पर्जन्यमापक यंत्र खराब असल्याने अतिवृष्टीची काही मंडळात नोंद झालेली नाही, तेथेही अतिवृष्टी गृहीत धरून मदत करण्यात यावी, जालना तालुक्यातील पाथ्रुड येथील धरण फुटून मृत्यू पावलेल्या शेतकर्याच्या कुटुंबियांना तत्काळ आर्थिक मदत देण्यात यावी अशा विविध मागण्या जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात आल्या.

यावेळी विभागप्रमुख प्रभाकर घडलिंग, ज्ञानेश्वर गोरे, जनार्दन गिराम, बळीराम ढवळे, विष्णुपंत गिराम, विठ्ठल पडूळ, सुदाम काळे, बाबासाहेब पाखरे,सुरेश वाघमारे, अर्जुन शेवाळे, राजु वैद्य, संजय जाधव, विठ्ठल पाउलबुद्धे, संजय गिराम, रमेश गिराम, जीवन खंडागळे, सखावत पठाण, बबनराव मिसाळ, परमेश्वर म्हत्रे, नागोजी थेटे, शेषराव लहाने, किसन राठोड, अरुण डोंगरे, अजय रोडीया, प्रभाकर खरात, संतोष क्षत्रिय, कैलास मिसाळ सुभाष पितांबरे, सुभाष काटकर, अनिस पठाण, सोनाजी खांडेभराड, रमेश तुंगेवार, विकास बोर्डे, तुकाराम भुतेकर, रामेश्वर कुरील, संदीप मगर यांच्यासह आदी पदाधिकार्यांचे उपस्थिती होती.




# ब्लू सफायर फूड प्रोसेसिंग प्रा. लि.चा गळीत हंगाम २०२५-२६ उत्साहात प्रारंभ

**तृतीय बॉयलर अग्निप्रदिपन सोहळ्याची जय्यत तयारी**

**आत्ताच एक्सप्रेस**

**घनसावंगी /प्रतिनिधी/**तालुक्यातील कंडारी (अंबड) येथील ब्लू सफायर फूड प्रोसेसिंग प्रा. लि. या कारखान्याचा गळीत हंगाम २०२५-२६ च्या औपचारिक सुरुवातीचा तृतीय बॉयलर अग्निप्रदिपन समारंभ येत्या रविवार, दि. १२ ऑक्टोबर रोजी मोठ्या उत्साहात व जल्लोषात पार पडणार आहे.या भव्य सोहळ्याचे शुभहस्ते निळकंठ अण्णासाहेब उढाण व सौ. निर्मलाताई निळकंठ उढाण यांच्या हस्ते तृतीय बॉयलरला अग्निप्रदिपन करण्यात येणार असून, या प्रसंगी कारखान्याचे संचालक, व्यवस्थापन मंडळ, अधिकारी, कर्मचारी, कंत्राटदार तसेच परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.कारखान्याच्या परिसरात सध्या हंगामाच्या प्रारंभाची तयारी जोरात सुरू असून, परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

नवीन हंगामात अधिक कार्यक्षमतेने गळीत प्रक्रिया होऊन शेतकऱ्यांना योग्य दर मिळेल, यासाठी व्यवस्थापनाने विशेष योजना आखल्या आहेत. ब्लू सफायर फूड प्रोसेसिंग प्रा. लि. हा कारखाना गेल्या काही वर्षांत शेतकऱ्यांसाठी उत्पादन विक्री, प्रक्रिया आणि मूल्यवर्धनाचे महत्त्वाचे केंद्र ठरला आहे.

शेतकऱ्यांच्या हितासाठी सतत प्रयत्नशील राहून त्यांचा विश्वास संपादन केलेला हा कारखाना, नव्या हंगामात आणखी सक्षमतेने व आधुनिक तंत्रज्ञानासह कार्यरत होणार आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813